जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १८९ दिनांक - २७/०३/२०२४**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोक्का गुन्हयातील फरार आरोपीस केले जेरबंद

तक्रारदार यांनी दिले तक्रार वरून चंदननगर पो.स्टे गुन्हा रजि.नं. ५३४/२०२३, भादंविक ३०८,१४३,१४७,१४८,१४९, ४२७, सह भारतीय शस्त्र अधिनियमकलम ४, २५, प्रमाणे महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२, ३७ (१)(३), १३५, सह क्रिमीनल लॉ अमेंटमेंट ॲक्ट कलम३,७, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३,(१)(फफ),३(२),३(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी आदित्य संदेश कांबळे, वय २३, रा. बालाजी नगर, लेन नं. ३, वडगाव शेरी पुणे हा गुन्हा करुन चार महिन्यापासुन फरार झाला होता. तो सातारा, सांगली, नाशिक, असे वेगवेगळे ठिकाणे बदलुन अटक चुकवित होता.

पाहिजे आरोपी आदित्य कांबळे याचा शोध घेत असताना, तपास पथकातील पोलीस अंमलदार विकास कदम यांचे तांत्रिक विश्लेषणाचे आधारे कौशल्यपुर्वक माहिती घेवुन व पोलीस अंमलदार महेश नाणेकर, सुरज जाधव यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत आदित्य कांबळे हा जुना मुंढवा रोड, साईनाथनगर, वडगाव शेरी पुणे येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने बातमीची खात्री करुन तपास पथकातील टिम सदर सदर ठिकाणी रवाना होवुन आरोपीचा शोध घेत असताना, आरोपी आदित्य कांबळे हा रावल भवन इमारती समोर उभा असल्याचे दिसल्याने आरोपी आदित्य कांबळे याची व पोलीस स्टाफची नजरा-नजर होताच त्याने तेथुन पळ काढला तेव्हा पोलीसांनी त्याचा पाठलाग करुन त्यास काही अंतरावर पकडुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्यानी त्याचे नाव **आदित्य संदेश कांबळे, वय २३, रा. बालाजी नगर,वडगाव शेरी पुणे** असे असल्याचे सांगितल्याने त्यास पुढील कार्यवाही कामी चंदननगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्हयात अटक केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा.पोलीस आयुक्त श्री. संजय पाटील येरवडा विभाग, पुणे शहर हे करीत आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ श्री. विजय मगर, मा. सहा. पोलीस आयुक्त, येरवडा विभाग- श्री. संजय पाटील चंदननगर पोलीस स्टेशनचे. वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुणे श्रीमती मनीषा पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.पंडित रेजितवाड, यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक पो.उप.निरीक्षक तान्हाजी शेगर, पोलीस अंमलदार- अविनाश संकपाळ, श्रीकांत शेंडे, विष्णु गोने, महेश नाणेकर, सचिन रणदिवे शिवाजी धांडे, गणेश हांडगर, शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सुरजजाधव, नामदेव गडदरे, विकास कदम, ज्ञानोबा लहाणे यांनी केली आहे.